REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १४ सप्टेंबर, १९३८ | अंक ३७

**सर्वांगीण प्रगति**
सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष

## वेस्टर्न इंडिया
**लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड**
सातारा शहर

१९३८ अखेर
*आठवें मूल्यमापन*
आणि
रौप्य महोत्सव

**त्रैवार्षिक बोनस**
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
*कोणत्याही दृष्टीनें पहा*
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

**The Co-operators' Book Depot.**
9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
**The Only Book Depot of its Kind in India.**
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.
किंमत बाटलीस १ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
३९।१३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

# विविध माहिती

### प्राण्यांवर शास्त्रीय प्रयोग

निरनिराळ्या रोगांवर उपाय शोधून काढण्याकरितां ससे, डुकरें इत्यादि प्राण्यांवर शास्त्रीय प्रयोग करण्यांत येत असतात. ग्रेट ब्रिटनमध्यें गेल्या वर्षी झालेल्या असल्या प्रयोगांची संख्या नऊ लक्षांच्यावर भरली. गुंगीचें औषध देऊन प्राण्यांस दुःख होणार नाहीं अशी व्यवस्था प्रयोग करणारे शास्त्रज्ञ करतात. खास परवान्यावांचून प्रयोग करतां येत नाहींत आणि नियमांचें उल्लंघन होणार नाहीं अशी काळजी घेण्यांत येते.

### जर्मनींत स्वस्त रेडिओच्या द्वारें प्रचार

रेडिओच्या द्वारें राजकीय प्रचार करण्याचे कामीं जर्मनीचा नंबर पहिला लागतो. रेडिओ ऐकणारांच्या, जर्मन राष्ट्राच्या पटावर पंचाण्णव लक्ष लोक नोंदलेले आहेत. सामान्य माणसासहि विकत घेणें परवडेल इतक्या हलक्या किंमतींत रेडिओ स्वस्त विकण्यांत येत आहेत. तीस-पस्तीस रुपये किंमतीचे रेडिओ जर्मनींत तयार केले जात आहेत. निम्म्याच्या वर जर्मन कुटुंबांनीं रेडीओ बाळगले असून हें प्रमाण झपाट्यानें वाढवण्यांत येणार आहे.

### पावणेचार कोटि मुखत्राणें

शत्रूनें सोडलेल्या विषारी धुरापासून नागरिकांचें संरक्षण व्हावें ह्या हेतूनें ब्रिटिश सरकारनें पावणे चार कोटि मुखत्राणें तयार केलीं असून तीं अकरा प्रमुख केंद्रांत साठवण्यांत आलीं आहेत. प्रत्येकीं पस्तीस हजार ह्याप्रमाणें तीं अनेक क्षेत्रांत लोकांमध्यें वाटण्यांत येतील. त्यांचा उपयोग कसा करावा हें जनतेस समजाऊन सांगण्याकरितां जाणतीं माणसें नेमण्यांत आलीं आहेत.

### दुसरीकडे बेकारी पण जर्मनींत कामकऱ्यांचा तुटवडा

लोकांस काम नाहीं अशी चोहोंकडे ओरड आहे. पण जर्मनींत मात्र कामकऱ्यांचा तुटवडा पडला आहे. आर्थिक दृष्ट्या जर्मनी पूर्णपणानें स्वावलंबी असल्याविषयींची घोषणा हेर हिटलर ह्यांनीं नुकतीच केली आहे.

### भरपूर पीक आणि बाजारभाव पडण्याची भीति

युरोप, कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया इत्यादि भागांत गव्हाचें पीक भरपूर येणार असा जागतिक अंदाज करण्यांत आला आहे. फाजील पुरवठ्यामुळें गव्हाचा बाजारभाव उतरेल ह्या भितीनें भरपूर पिकाची वार्ता आनंददायक न होतां उलट चिंताजनक झाली आहे, ही जगाची अलीकडील उफराटी परिस्थिति होय!

### सायकलस्वारांस उत्तेजन

नागरिकांचें आरोग्य सुधारण्यासाठी ब्रिटिश सरकारनें व्यायामाच्या सोयी वाढवल्या असून सायकलस्वारांस उत्तेजन देण्याचें ठरवलें आहे.

### ॲक्चुअरीची परीक्षा

इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजची प्राथमिक परीक्षा ता. २४ जानेवारी रोजीं घेण्यांत यावयाची आहे. उमेदवारांचे अर्ज आणि परीक्षेची फी ही लंडन येथील सेक्रेटरीस १४ नोव्हेंबरचे पूर्वी मिळाली पाहिजेत.

### राष्ट्रसंघाचें १९ वें अधिवेशन

राष्ट्रसंघाच्या असेंब्लीच्या १९ व्या अधिवेशनास सोमवार, ता. १२ रोजीं प्रारंभ झाला. हिंदुस्थानातर्फे सर एन. एन. सरकार ह्यांचे नेतृत्वाखालीं सर षण्मुखम् चेट्टी, सर सुलतान अहमद आणि मि. डब्ल्यू. जी. कॉफ्ट हे उपस्थित होत आहेत.

### शैक्षणिक चित्रपटांचा प्रसार

शैक्षणिक चित्रपटांच्या प्रसाराच्या पुनरुज्जीवनाचा विचार करण्यासाठीं प्रमुख राष्ट्रांचे प्रतिनिधी जिनिव्हा येथें गेल्या आठवड्यांत एकत्र जमले होते.

### "सुटां"त तेरा मैल लांबीचे धागे

एका विलायती "सुटां"त विणलेल्या धाग्यांची एकूण लांबी मोजली तर ती सुमारें तेरा मैल भरेल अशा हिशेब एका गणित्यानें केला आहे.

### ग्रेटब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी

सन १९३६-३७ मध्यें सुमारें १,८५० हिंदी विद्यार्थी ग्रेट ब्रिटनमध्यें शिक्षण घेत होते.

### लँकेशायरची दुरवस्था

खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें कापडाची आयात वाढत आहे आणि लँकेशायरचें कापड मागें पडत जाहे. सध्याइतके वाईट दिवस लँकेशायरच्या गिरण्यांचे अनुभवास आजवर कधींच आले नव्हते असें म्हणतात.

### निजाम स्टेट रेल्वेचें उत्पन्न

निजाम स्टेट रेल्वेचें उत्पन्न गेल्या वर्षीं ७ टक्क्यांनीं वाढलें तरी खर्चांत फक्त १६ टक्क्यांनीं वाढ झाली. रेल्वे आणि मोटारवहातुक ह्यांची सांगड घालून परस्पर स्पर्धेस आळा घालण्याचें धोरण निजाम सरकारनें स्वीकारलें आहे.

### त्रावणकोर बँकेच्या प्रकरणीं हायकोर्टांत अर्ज

त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँकेचें प्रकरण कोर्टापुढें असतांना, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर जेम्स टेलर, तिच्या स्थानिक शाखेचे मॅनेजर श्री. भार्गव आणि मद्रास मेल पत्राचे संपादक ह्यांनीं बँकेबाबत पत्रकें प्रसिद्ध केलीं आणि त्यामुळें कोर्टाची बेअदबी झाली, असा अर्ज मद्रास हायकोर्टाकडे बँकेच्या एका घेणेकऱ्यानें सादर केला आहे.

### मद्रास सरकारचें नवें कर्ज

मद्रास प्रांतिक सरकारनें ३ टक्के दराचें १९५२ सालीं परतफेडीचें १½ कोटि रुपयांचें कर्ज विक्रीस काढलें आहे. १०० रुपयांच्या रोख्याची किंमत ९९रुपये आहे. बुधवार, ता.१४सप्टेंबर रोजीं अर्ज स्वीकारले जातील. १½ कोटि रुपयांच्या कर्जापैकीं ४० लक्ष रुपयांचें कर्ज मद्रास सरकार स्वतःच्या आपल्या फंडांतून घेणार आहे. कर्जाचा विनियोग विद्युतयोजना, पाणी पुरवठ्याच्या योजना, स्थानिक स्वराज्य संस्था, शेतकरी, इत्यादींस सहाय वगैरे उत्पादक कार्यांकडे केला जावयाचा आहे.

### सेन्सॉर बोर्डाचा चित्रपटांस काट

१ जानेवारी ते ३० जून, १९३८ ह्या सहा महिन्यांत मुंबईच्या फिल्म्स् सेन्सॉर बोर्डानें ८½ लक्ष फूट लांबीच्या हिंदी फिल्म्स् तपासल्या. त्यांपैकीं वेगवेगळे तुकडे मिळून २ हजार फूट लांबीच्या फिल्म्स् बोर्डानें आक्षेपार्ह ठरविल्या. म्हणजे, प्रत्येक १००फुटांतील ३ इंच फिलम नापास झाली, अशी सरासरी पडते.

### ट्रेझरी बिलांवर ११ आणे १० पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत विकलेल्या हिंदुस्थान सरकारच्या २ कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. १० पै इतका पडला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| २८-८-३८ ते ३-९-३८ | ७,६७,८१० |
| ४-९-३८ ते १०-९-३८ | ८०१ |
| २१-९-३१ ते १०-९-३८ | ३, १९, २९, ४१, ४७३ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४४६ |
| २ धान्याचीं आणि कच्च्या मालाचीं कोठारें ... | ४४७ |
| ३ हिंदी उद्योगधंद्याची प्रगति ... ... | ४४८ |
| ४ ब्रिटिश विमा कंपन्या आपले पैसे कसे गुंतवितात ?... ... | ४४८ |
| ५ स्फुट-विचार ... ब्रिटिश धंद्यांस जकातींचें संरक्षण—ग्रेट ब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी—जनतेच्या आरोग्याचा प्रश्न—हिंदुस्थानांतील मृत्यूंची वर्गवारी—नवीन कर्जांची उभारणी—वारसावरील कर. | ४४९ |
| ६ सोनें, चांदी, नोटा आणि नाणीं ... ... | ४५१ |
| ७ इंडियन स्टोर्स डिपार्टमेंटचा अहवाल ... ... | ४५१ |
| ८ ताळेबंद तयार कसा करावा ? ... ... | ४५२ |
| ९ इरिगेशन कमिटीचा अहवाल ... ... | ४५३ |
| १० ससून मिल सहकारी पतपेढ्या ... ... | ४५३ |
| ११ सहकारी चळवळ ... | ४५३ |
| १२ निवडक बाजारभाव | ४५५ |



# अर्थ

बुधवार, ता. १४ सप्टेंबर, १९३८


## ग्रेट ब्रिटनमध्यें धान्याचीं आणि कच्च्या मालाचीं कोठारें

### कौटिलीय अर्थशास्त्रांतला 'पण्याध्यक्ष'

कौटिलीय 'अर्थशास्त्रां'त ३७ व्या अध्यायांत 'पण्याध्यक्षा'चीं कामें सांगितलीं आहेत. त्यांत "तथा विक्षेपसंक्षेपक्रयविक्रय-प्रयोगकालान्" म्हणजे, कोणता जिन्नस केव्हां अधिक साठवावा, केव्हां कमी साठवावा, कोणत्या वस्तूची विक्री केव्हां करावी व खरेदी केव्हां करावी याचें त्याला ज्ञान असतें असें म्हटलें आहे. आज इंग्लंडमध्यें ह्या प्रकारच्या पण्याध्यक्षाची स्थापना व्हावी अशा आशयाची सूचना एका विख्यात ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञानें नुकतीच केली आहे ह्याचें नवल वाटेल. "खाद्य पदार्थ आणि कच्चा माल ह्यांची सरकारी देखरेखीखालीं साठवण" ह्या विषयावर सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ, मि. जे. एम्. केन्स ह्यांनीं ब्रिटिश असोसिएशनच्या अर्थशास्त्र विभागास एक निबंध सादर केला त्यांतील सूचना नाविन्यपूर्ण असून सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत महत्त्वाच्या आहेत. हल्लीच्या स्पर्धेच्या युगामध्यें, फाजील उत्पादनाचा कांहीं भाग साठवून ठेवण्याकडे व्यक्तिगत कारखानदारांची प्रवृत्ति होत नाहीं आणि त्यामुळें उत्पादनामध्यें एकसूत्रीपणा येऊं शकत नाहीं. साठवणीस खर्च बराच येतो, व्याजाचा बोजाहि सहन करावा लागतो आणि इतकें होऊनहि किती काळ साठवण कायम ठेवावी आणि मालास अखेर किंमत काय येईल हें अनिश्चित रहातें. हेंच काम सरकारनें स्वतःकडे घेऊन योग्य ती योजना केली, तर मालाच्या बाजारभावांतील हेलकावे कमी होतील आणि त्याहिपेक्षा ज्यास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे, राष्ट्राच्या संकटसमयीं अन्नाच्या पुरवठ्याचा आणि कच्च्या मालाच्या साठ्याचा सरकारास उपयोग होऊन राष्ट्रीय आपत्तीस तोंड देण्यास त्यास बहुमोल सहाय होईल. वरील प्रकारची विचारसरणी मि. केन्स ह्यांच्या योजनेच्या मुळाशी आहे. तिचा विशेष हा आहे कीं अडचणींस तोंड देण्याकरितांच तीं अंमलांत आणावयाची नसून शांततेच्या काळांतहि तिचा राष्ट्रास उपयोग होईल असें त्यांचें म्हणणें आहे.

ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व उत्पादकांस आपला विशिष्ट माल ग्रेटब्रिटनमध्यें साठवून ठेवण्यास सरकारनें उत्तेजन द्यावें, साठवणीचा खर्च त्यांचेवर पडूं नये आणि व्याजाचा बोजाहि त्यांस सहन करावा लागूं नये अशी व्यवस्था करण्यांत यावी; हें शक्य नसल्यास त्यांचेकडून अल्पशी पट्टी घेतली जावी, अशी मि. केन्स ह्यांची सूचना आहे. साठवलेल्या मालाची मालकी मूळ मालकांकडेच रहावी, बाजारभावांतील चढउताराच्या नफा-नुकसानीची जबाबदारी त्यांचेवरच असावी आणि वाटेल तेव्हां त्यांनीं माल भरावा अगर काढून न्यावा, मात्र त्यास कांहीं किमान काळाची नोटीस आवश्यक असावी आणि कांहीं विशिष्ट कमींत कमी कालपर्यंत माल कोठारांत राहिलाच पाहिजे, अशी तरतूद असावी, वगैरे तपशीलवार नियम मि. केन्स ह्यांनीं सुचविले आहेत. अशा रीतीनें प्रत्येक वर्षी सुमारें २५ कोटि रुपये सरकारनें तिजोरींतून खर्च केले असतां ६५० कोटि रुपयांचा माल सरकारी नियंत्रणाखालीं येईल आणि राष्ट्रीय आपत्तीचे प्रसंगीं एका चुटकीसरशी एवढा प्रचंड साठा सरकारास विकत घेतां येईल. मोठ्या स्वरूपाचें युद्ध उद्भवल्यास, आयत्यावेळीं जगाच्या कानाकोपऱ्यांतून खाद्य पदार्थ आणि कच्चा माल गोळा करून आणण्याऐवजी एके ठिकाणीं त्याचा साठा सांपडल्यास ब्रिटिश सरकारची फारच मोठी सोय होणार आहे. इतर राष्ट्रांस ह्या प्रकारच्या संरक्षणाची तरतूद करतां येणें शक्य होणार नाहीं; एकट्या ब्रिटिश सरकारासच तें शक्य होईल, हें त्यांतील वैशिष्ट्य आहे. कनेडियन सरकारास गव्हाच्या फाजील उत्पादनामुळें बाजारावर प्रतिकूल परिणाम होऊं नये म्हणून गहूं खरेदी करावा लागला, तर तें सरकार हा गहूं ग्रेटब्रिटनमधील कोठारांत आणून ठेवूं शकेल. वेस्ट इंडीजमधील साखर, हिंदुस्थानांतील ताग, ऑस्ट्रेलियांतील लोकर, पश्चिम आफ्रिकेंतील तैलयुक्त आणि अनेक इतर जिन्नस ग्रेटब्रिटनमध्यें साठवून ठेवल्यानें सर्वांचाच फायदा होणार आहे; विशेषतः युद्धाचे प्रसंगीं सोन्याच्या खाणींपेक्षा हीं कोठारें अधिक मोल्यवान ठरतील, असा मि. केन्स ह्यांस भरंवसा वाटत आहे. इतक्या किंमतीच्या मालाची ग्रेटब्रिटनमध्यें आयात झाली म्हणजे हुंडणावळीवर ताण पडणें अपरिहार्य आहे. तथापि, मालाच्या किंमतींची रकम लंडनमधील बँकांचे खात्यावरच रहाण्याचा संभव असल्यानें ही अडचण विशेष भासणार नाहीं. ब्रिटिश मालाच्या निर्गतीस त्यामुळें चालना मिळण्याचा संभव आहे. ब्रिटिश साम्राज्यांत उत्पादन झालेला माल ग्रेटब्रिटनमधील कोठारांत येऊन पडला, म्हणजे ब्रिटिश कर्जाचें तारण नजरेखालीं राहील आणि त्याची रकम केव्हांहि उभी करतां येईल, हाहि फायदा कमी महत्वाचा नाहीं. हा साठा वाढला म्हणजे त्या मानानें सोन्याच्या स्वरूपांतील ब्रिटिश जिंदगी कमी होईल. कारण, तितकी रकम मालाच्या उत्पादकांस देण्यासाठी कर्ज म्हणून परदेशीं जाईल. तथापि अडचणींचे प्रसंगीं प्रत्यक्ष सोन्यापेक्षा उपयुक्त मालाची साठवण अधिक महत्वाची ठरेल, हें उघड आहे.

वरील प्रकारच्या, माल साठवण्याच्या योजनेमुळें ग्रेट ब्रिटनला प्रत्यक्ष पैशाचे स्वरूपांत कांहींहि नफा होणार नाहीं. तथापि संपत्तीचा एवढा मोठा प्रचंड साठा हाताशीं असणें हें ब्रिटिश

राष्ट्राचें वजन वाढविण्यास सहायकारक होऊन त्यामुळें त्या राष्ट्राचें स्थान मजबूत होण्यास मदत होईल. इतक्या महत्त्वाच्या फायद्याचे मानानें, योजनेस येणारा खर्च क्षुल्लकच समजला पाहिजे. सबंध जगाच्या नजरेंत भरणारा मालाचा हा साठा युद्ध-संभवाम पायबंद घालील आणि ब्रिटिशांच्या लष्करी तयारीत भर टाकून इतर राष्ट्रांवर त्याचें नैतिक दडपण पडेल असें मि. केन्स ह्यांस वाटत आहे. शांततेचे काळीं स्वस्ताई असतांना सोन्याऐवजी मालच साठवणें आणि महागाई झाली म्हणजे तो विकून त्याचें सोनें करणें हें व्यापक राष्ट्रीय दृष्ट्या फायद्याचें होईल, असा त्यांचा अभिप्राय आहे. ग्रेट ब्रिटन-सारख्या राष्ट्राचे दृष्टीनें मि. केन्स ह्यांची योजना बलसंवर्धक आहे ह्यांत संशय नाहीं. अपेक्षित युद्धसंभवाच्या पूर्वतयारीचा हा अभिनव उपक्रम प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्यास ब्रिटिश सरकाराजवळ योग्य ती कायदेशीर तरतूद आहे. कांहीं मालाची खरेदी आणि साठवण त्यानें केलीहि आहे. बोर्ड ऑफ ट्रेडनें स्वतःकडे विशिष्ट अधिकार घेतले आहेत त्याचा उपयोग करून व्यापक प्रमाणांत मालाचा साठा ब्रिटिश सरकारनें कर-ण्याची मि. केन्स ह्यांची योजना आहे. आर्थिक तेजी-मंदीच्या दुष्परिणामांची तीव्रताहि त्यामुळें कमी होईल, अशी त्यांची अपेक्षा आहे. मि. केन्स ह्यांच्या 'पण्याध्यक्षाच्या' योजनेचा योग्य तो विचार होईलच. नवीन विचारसरणीचे ते प्रवर्तक आहेत. परंपरागत ब्रिटिश अर्थशास्त्रास त्यानें धक्काहि बसेल आणि त्यावर वादाचें रणहि माजेल. राष्ट्रीय सरकारच्या व्यवहारक्षेत्रांत किती झपा-ट्यानें विस्तार होत चालला आहे, हें तूर्त त्यावरून स्पष्ट होत आहे. राष्ट्राच्या जीवनाचा ओघ व्यक्तिगत प्रयत्नांवर अवलंबून न ठेवतां राष्ट्रीय धोरणानुसार तो चालावा, हें तत्त्व हिंदुस्थान सरकार अद्याप मान्य करण्यासहि तयार नाहीं. ब्रिटनमधील त्याबाबतचे विचारप्रवाह आणि सरकारची कृति हिंदुस्थानास मार्गदर्शक झाली पाहिजेत.

---

### हिंदी उद्योगधंद्यांची प्रगति

(मुंबई प्रांताच्या औद्योगिक खात्याचे डायरेक्टर, मि. अडवानी, ह्यांचें रेडिओवरील भाषण)

"मुंबई प्रांतामध्यें औद्योगिक व्यवसायावर पोट भरणारांची संख्या ११½ लक्ष आहे त्यांपैकीं ४ लक्ष लोकांस मोठ्या कार-खान्यांत काम मिळतें. त्यांतील २ लक्ष, १५ हजार लोक कापडाच्या गिरण्यांत आहेत. उद्योगधंद्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची वेगवेगळ्या देशांतील प्रत्येक माणशी सरासरी खालील प्रमाणें आहे:—हिंदुस्थान: १२ रु.; जपान: १५८ रु., ग्रेट ब्रिटन: ४१२ रु.; अमेरिका: ७२१ रु.. हिंदुस्थानाची औद्योगिक प्रगति फारच मंदगतीनें होत आहे. आपल्या लोकांचें दारिद्र्य आपणांस दूर करावयाचें असल्यास आपण उद्योगधंदे झपाट्यानें वाढवले पाहिजेत आणि शेतीचें उत्पादनहि सुधारलें पाहिजे. त्यास यंत्रें आणि रासायनिक खतें लागतील तीं औद्योगिक प्रगति घडून आली कीं हिंदुस्थानांतच तयार होऊं लागतील. उद्योगधंद्यांची सुधारणा घडवून आणण्यासाठी त्या त्या शाखेंतील तज्ज्ञ आणि लायक लोकांची आपणांस जरूर भासेल. आपल्या प्रांतांतील १ कोटि, ७० लक्ष लोकसंख्येपैकीं १४ लक्ष लोक कोणत्याना कोणत्यातरी शिक्षण संस्थेंत शिक्षण घेतात. ह्यांपैकीं ४०० मध्यें फक्त एकच जण औद्योगिक अगर यांत्रिक शिक्षण घेतो. ह्या परिस्थितींत सुधारणा होणें आवश्यक आहे. मुंबई प्रांतांतील उमेदवारीच्या योजनेप्रमाणें अनेक योजना अंम-लांत आल्या पाहिजेत"

---

## ब्रिटिश विमा कंपन्या आपले पैसे कसे गुंतवितात?

एकॉनॉमिस्ट ह्या ब्रिटिश साप्ताहिकानें, ग्रेट ब्रिटनमधील ३८ प्रमुख विमा कंपन्यांनीं आपले पैसे कसे गुंतविले आहेत ह्या-संबंधीं आकडे प्रसिद्ध केले आहेत. ह्या कंपन्यांनीं गुंतविलेल्या रकमांची एकूण बेरीज १,५०० कोटि रुपयांपेक्षा अधिक भरते. ह्यावरून त्यांच्या व्यवहाराचा प्रचंड आकार ध्यानांत येईल. ब्रिटिश विमा कंपन्या घरांचे तारणावर सढळपणें पैसे देतात. घरांचे गहाणाबरोबर विमा पॉलिसींचें तारणहि मिळूं शकतें, त्यामुळें हे पैसे सुरक्षित असतात. आयुर्विम्याप्रमाणें इतर विम्याच्या धंदा कंपनी करीत असल्यास, त्यालाहि काम मिळतें. घरांच्या गहाणामुळें विमा कंपनीचा लोकांशीं परिचय वाढून तिला नवीन काम मिळण्यास सहाय होतें. १९११ सालीं ब्रिटिश विमा कंपन्यांनीं आपल्या पैशांपैकीं फक्त १½% इतकी रकम सरकारी रोख्यांत गुंतविली होती. हें प्रमाण १९२१ सालीं ३५% पर्यंत वाढलें, तें पुढें हळू हळू कमी होत गेलें. सध्याची प्रवृत्ति कमी मुदतीच्या सरकारी रोख्यांत रकम गुंतविण्याची आहे, कारण त्यामुळें रोख्यांच्या बाजारभावांत होणाऱ्या घटीचा दुष्परिणाम टाळतां येतो. इतर देशांच्या कर्जरोख्यांत पैसे गुंतविण्याच्या प्रवृत्तीस आतां आळा बसला आहे. त्यांच्या बाजारभावांत झालेला उतार आणि त्यामुळें विमा कंपन्यांचें झालेलें नुकसान व परराष्ट्रांत रकम गुंतविण्याच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी, ह्यांचा तो परि-णाम आहे. मंडळ्यांचे ऑर्डिनरी आणि प्रेफरन्स भाग खरेदी करण्याकडे विमा कंपन्यांचा विशेष कल आहे. व्याजाच्या उत-रत्या दराचे काळांत इतर ठिकाणीं होणारी घट भरून काढल्या-विना गत्यंतर नाहीं, ह्यामुळें त्यांस मंडळ्यांच्या भागांकडे लक्ष पुरविणें भाग पडत आहे. भागांत पैसे गुंतविणें आजवर श्रेयस्कर समजलें जात नसे. विमा कंपन्यांच्या एकूण जिंदगीपैकीं फक्त ९·२ टक्के रकमच सध्या मंडळ्यांचे भागांत गुंतलेली असली, तरी हें प्रमाण वाढत जाणार, असें मानण्यास जागा आहे. खालील कोष्टकांत ब्रिटिश विमा कंपन्यांनीं आपले पैसे कसे गुंत-विले आहेत, ह्याचा तपशील दिला आहे:—

| वर्ष | १९२५ | १९३० | १९३७ |
|---|---|---|---|
| गहाण खतें, पॉलिसीवरील कर्जे इ. | २५·३ | २९·३ | २३·० |
| ब्रिटिश कर्जरोखे | २८·७ | १६·९ | १७·५ |
| इतर रोखे | ३३·८ | ४४·३ | ५०·० |
| इतर | १२·२ | ९·५ | ९·० |
| | १००·० | १००·० | १००·० |

१९३७ सालीं, आपल्या एकूण पैशांपैकीं शेकडा ६७·५ इतकी रकम विमा कंपन्यांनीं स्टॉक एक्स्चेंज सिक्युरिटीजमध्यें गुंत-विली होती. त्यांतील ब्रिटिश सरकारचे रोखे वगळले असतां उर-लेल्या शेकडा ५० रकमेची वर्गवारी खालील प्रमाणें आढळते:—

| रोख्यांचा प्रकार | एकूण रकमेशीं प्रमाण |
|---|---|
| परराष्ट्रीय सरकारचे कर्जरोखे | ७·५ |
| ब्रि. म्युनिसिपल व कौंटी कर्जरोखे | २·८ |
| परराष्ट्रांतील म्युनिसिपल कर्जरोखे | २·३ |
| डिबेंचर स्टॉक | १८·७ |
| प्रेफरन्स आणि गॅरंटीड स्टॉक | ९·५ |
| ऑर्डिनरी स्टॉक | ९·२ |
| | ५०·० |

## स्फुट विचार

### ब्रिटिश धंद्यांस जकातींचें संरक्षण

चित्रपट, वाद्यें, मोटारगाड्या व घड्याळें ह्यांवर संरक्षक जकाती ग्रेटब्रिटनमध्यें १९१५ सालीं प्रथम बसविण्यांत आल्या. त्या-वेळच्या फडनविसांच्या नांवावरून त्या "मॅककेना" जकाती म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची मुदत संपल्यामुळें ह्या जकाती औपचारिक रीत्या गेल्या आठवड्यांत संपुष्टांत आल्या. ग्रेट-ब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या मोटारी, घड्याळें, इत्यादि परदेशी मालावरच्या संरक्षक जकाती नाहींशा होऊन ब्रिटिश राष्ट्राचें औद्योगिक संरक्षणाबाबतचें धोरण खुल्या व्यापाराच्या बाजूस वळलें असें मात्र ह्यावरून समजावयाचें नाहीं. कारण मॅककेना जकातींची जागा त्याच तऱ्हेच्या दुसऱ्या जकातींनीं घेतली आहे. आतां काढून टाकण्यांत येणाऱ्या जकाती निश्चित प्रमाणांतल्या म्हणजे ३३⅓ टक्क्यांच्या होत्या. नवीन जकातींचा विशेष हा आहे कीं संरक्षित धंद्यांतल्या लोकांस जरूरीप्रमाणें त्या वाढवल्या जाव्या असा त्या संबंधांतल्या सल्लागार मंडळाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे. जर्मनीमधून "ओपेल" मोटार गाड्या इंग्लंडमध्यें येतात आणि त्यांची स्पर्धा ब्रिटिश गाड्यांस जाचक होते; तसेंच जर्मन सरकारची त्यांच्या धंद्यास मदत असल्यानें ही स्पर्धा अन्याय्यहि आहे अशी तक्रार त्या मंडळाकडे केली जाईल असें म्हणतात. कांहीं अमेरिकन मोटारींच्या बाबतींतहि जादा संरक्षणाविषयींची अशीच मागणी ब्रिटिश कारखानदार करतील असें दिसतें. ग्रेट ब्रिटनच्या भोवती उभारलेले संरक्षक जकातींचे तट नाहींसे होण्याचे ऐवजी अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न कसा चालला आहे हें या माहितीवरून स्पष्ट समजेल. अशा परिस्थितींत हिंदी स्वदेशी धंद्यांस जकातींचें संरक्षण देण्याचे बाबतींत ब्रिटिश सरकारनें खळखळ कां करावी?

### ग्रेट ब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी

लंडन येथील हिंदी हाय कमिशनराच्या कार्यक्षेत्रांत इंग्लंड-मधील हिंदी विद्यार्थ्यांच्या सोई पाहणें व त्यांच्या अडचणी दूर करणें ह्या कामाचा अंतर्भाव होतो. हाय कमिशनरच्या शिक्षण खात्याचा १९३६-३७ चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत इंग्लंडमध्यें नवीन दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांस दरसाल-प्रमाणें सूचना करण्यांत आल्या आहेत. विलायतेंत उच्च शिक्षण घेऊन हिंदुस्थानांत परत येणाऱ्या विद्यार्थ्यांस नोकरी मिळ-ण्याची बरीच अडचण पडते, ह्या गोष्टीचा रिपोर्टांत उल्लेख आहे. हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांजवळ इंग्लंडमध्यें रहा-ण्यास पुरतील इतके पैसे असण्याची आवश्यकता हाय कमि-शनरच्या रिपोर्टांत दरवर्षी प्रतिपादण्यांत येतें, परंतु ह्या अत्यंत महत्वाच्या बाबीकडे अद्याप दुर्लक्ष केलें जातें, असें दिसतें. आपल्या मुलांस परदेशांत धाडण्यापूर्वी पालकांनीं त्यांची पुरी वैद्यकीय तपासणी करवून घ्यावी, असा हाय कमिशनरचा पाल-कांना सल्ला आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या शास्त्रीय शिक्षणांत आधुनिक भाषांचें ज्ञान अगत्याचें असतें आणि ह्या ज्ञानाचा उपयोग अभ्यासाप्रमाणें इतर ठिकाणींहि होतो, असें रिपोर्टांत म्हटलें आहे. पुरेशा लायकीविना किंवा शिक्षण संस्थांत प्रवेश मिळण्यास अवसर न ठेवतां घाईनें इंग्लंडमध्यें दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची कुचंबणा होते, तिचेकडे रिपोर्टांत लक्ष वेधण्यांत आलें आहे. ग्रेट ब्रिटनमधील विश्वविद्यालयांच्या पदव्या मिळवि-णाऱ्या विद्यार्थ्यांस हिंदुस्थानांत प्राधान्य दिलें जातें, ह्या कारणानें उच्च शिक्षणासाठीं ग्रेट ब्रिटनकडे धाव घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सालोसाल वाढत आहे. ज्या प्रकारचें शिक्षण हिंदुस्थानांत मिळूं शकतें, त्याच प्रकारचें शिक्षण घेण्याकरितां विलायतची यात्रा करणारा विद्यार्थी जास्त लायक ठरून अधिक वेतन द्यावें न लागतां जोपर्यंत नोकरीस रहाण्यास तयार असतो, तोपर्यंत चढा-ओढीखातर पाश्चात्य देशांत शिक्षणाप्रीत्यर्थ जाणारांची संख्या फुगत जाणें अपरिहार्य आहे. हिंदी विश्वविद्यालयांत शिक्षण घेणें आतां आर्थिक दृष्ट्या नुकसानीचें झालेंच आहे आणि विलायतेंतून आलेल्या पदवीधरांसहि झालेला खर्च भरून काढणें कठीण पडूं लागलें आहे. विशेष प्रकारचें शास्त्रीय आणि यांत्रिक शिक्षण घेण्यासाठी थोडी झीज सोसूनहि पाश्चात्य देशांत जाणें निराळें आणि येथें मिळणारेंच शिक्षण विलायतेंत अधिक खर्च करून मिळ-विणें निराळें. महाग पडणारा माल खरोखरच जास्त चांगला आणि अधिक उपयुक्त असला तर त्याचा फायदा; नाहीं तर रंगीत कागदांत गुंडाळलेला तोच जिन्नस फाजील किंमतीस घेण्यानें जशी फसगत होते, तशीच आपत्ती येथें ओढवावयाची. वैयक्तिक स्वार्थ आणि व्यापक सामाजिक हित ह्यांमध्यें विरोध दिसून येतो, तेथें समाजाच्या नेत्यांनीं मध्यें पडून ही विसंगती स्पष्ट करून दाखविली पाहिजे.

### जनतेच्या आरोग्याचा प्रश्न

हिंदुस्थानांतील सर्व म्युनिसिपॅलिट्यांनीं मिळून आपल्या आरोग्य खात्यांवर १९३५-३६ सालीं एकूण ४½ कोटि रुपये खर्च केले. म्युनिसिपॅलिट्यांचें एकूण उत्पन्न १८½ कोटि रुपये झालें. जिल्हा बोर्डांनीं आपल्या एकूण १९ कोटि रुपये उत्पन्नापैकीं सार्वजनिक आरोग्याचे कामीं १ कोटि रुपये खर्च केले. हिंदुस्था-नामधील १,२९८ शहरांपैकीं फक्त २५० शहरांत, म्हणजे शेकडा १९ ठिकाणीं पाण्याचे नळ आहेत. सुमारें ३० हजार खेड्यांत पाण्याचे अत्यंत हाल आहेत. हिंदी लोकसंख्येपैकीं शेकडा ८९ लोक खेडेगांवांत रहातात; तेव्हां साहजिकच त्यांच्या आरोग्याचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा आणि त्याचप्रमाणें बिकट असा आहे. खेडे-गांवांतील लोकांची रहाणी सुधारण्याचा यत्न अनेक मार्गांनीं करून त्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि शारीरिक सुधारणा घडवून आणल्याखेरीज त्यांच्या आरोग्याचा प्रश्न सुट-णार नाहीं, असें पब्लिक हेल्थ कमिशनरनें आपल्या ताज्या अह-वालांत म्हटलें आहे. प्रांतिक सरकारांनीं आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग खेडेगांवांतील लोकांच्या आरोग्यासाठी राखून ठेवावा असेंहि त्यानें सुचविलें आहे. खाद्य पदार्थांतील भेसळ थांबविण्याची आवश्यकता, शाळांतील मुलांची शारीरिक तपासणी आणि रोगांवर तात्काळ उपाययोजना ह्यांची आणि लोकांस रहाण्यासाठी स्वच्छ आणि मुबलक जागा असण्याची जरूरी, ह्यांचाहि अह-वालांत प्रामुख्यानें उल्लेख करण्यांत आला आहे. आरोग्याच्या संवर्धनाबाबत सबंध हिंदुस्थानांत एकसूत्रीपणा यावा, ह्या हेतूनें सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्ड स्थापण्यांत आलें आहे; परंतु अद्याप निम्मीं जिल्हा बोर्डें आणि तीन-चतुर्थांश म्युनिसिपॅलिट्या ह्यांच्या आरोग्य खात्याचे अधिकारी आवश्यक त्या विशिष्ट लायकीचे नाहींत आणि आरोग्याचे वाढीसाठी खर्चण्यास पुरेसा पैसा नाहीं तोंवर केवळ वरून देखरेख करून किती उपयोग होणार?

## हिंदुस्थानांतील मृत्यूंची वर्गवारी

ब्रिटिश हिंदुस्थानांत १९३६ सालीं एकूण ६४ लक्ष लोक मरण पावले. त्यांपैकी १ लक्ष ६० हजार कॉलऱ्यास बळी पडले, १ लक्ष, ५ हजारांस देवी आल्या होत्या, १३ हजार जणांच्या मृत्यूंचें कारण प्लेग आणि ३६ लक्ष लोकांच्या मृत्यूस ताप हें निमित्त झालेलें नोंदण्यांत आलें होतें. १८९६ सालीं हिंदुस्थानांत प्लेगचा प्रादुर्भाव प्रथम झाला, त्यानंतर १९३६ सालाइतके कमी बळी त्यानें कधींच घेतले नव्हते. ह्या वर्षांत प्लेगनें मरण पावलेल्या लोकांपैकीं शेकडा ५६ संयुक्त प्रांतांतील होते. ब्रिटिश हिंदुस्थानांत दरसाल १२½ लक्ष लोक हिंवतापानें मरण पावतात आणि १० कोटि लोकांस हिंवतापाची बाधा होते असा अजमास आहे. हिंवतापास आळा घालण्याची कोणतीहि योजना लोकांच्या आर्थिक शक्तीबाहेरची असल्यानें, तूर्त क्वायनेलचा प्रसार करण्यावरच संतुष्ट रहाणें अपरिहार्य आहे, असें डायरेक्टर ऑफ मलेरिअल सर्व्हे इन इंडियाचें मत आहे. क्षयरोगाचा फैलाव वाढत असल्याचें दिसून येत आहे. जगांतील एकूण ५० लक्ष महारोग्यांपैकी एकट्या हिंदुस्थानांत १० लक्ष महारोगी आहेत, असा अंदाज आहे. ह्या रोगाचें प्रमाण स्त्रियांचे मानानें पुरुषांत दुपटीनें अधिक आढळतें.

---

## पहिलें कर्ज न फेडतां नवीन कर्जाची उभारणी

महायुद्धाचे प्रसंगीं ग्रेट ब्रिटननें अमेरिकेकडून कर्ज काढलें, त्याच्या परतफेडीचा एकहि हप्ता डिसेंबर, १९३२ नंतर देण्यांत आलेला नाहीं. ह्या कर्जाच्या रकमेचा विनियोग युरोपांतील मित्रराष्ट्रांस कर्ज देण्याकडे ग्रेट ब्रिटननें केला व त्यांनीं त्याची फेड करण्याची असमर्थता जाहीर केली. तथापि तेवढ्यानें ग्रेट ब्रिटनवरील कर्जफेडींची जबाबदारी दूर झालेली नाहीं. अमेरिकेच्या कर्जाची फेड न करतां युद्धोपयोगी सामुग्रीसाठी मात्र ग्रेट ब्रिटन कर्जावर कर्ज काढीत आहे. अमेरिकेंतील लोकांस हें साहजिकच पसंत नाहीं. इंग्लंड अमेरिकेचें कर्ज नाकबूल करीत नाहीं, पण त्याची फेडहि करीत नाहीं अशी सांप्रतची परिस्थिति आहे.

---

## वारशावरील कर

सन १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टान्वयें वारशावरील कराची बाब हिंदुस्थान सरकारचे कक्षेंत येत असून त्या सरकारनेंच हा कर बसवून जमा करावयाचा आहे. प्रत्येक वर्षी जमा होणारें उत्पन्न मात्र त्यानें प्रांतांमध्यें वाटून द्यावयाचें आहे. ह्या करावर आणखी एक जादा पट्टी बसविण्याचा अधिकार फेडरल विधिमंडळास राहील आणि ह्या पट्टीचें उत्पन्न मध्यवर्ती सरकारास मिळेल. हिंदुस्थानांत वारशावर कर बसविणें कितपत व्यवहार्य होईल, ह्याविषयीं चौकशी करण्याचें काम हिंदुस्थान सरकारनें हातीं घ्यावें अशी विनंति प्रांतिक फडनवीसांनीं त्या सरकारास केली होती, तीस अनुसरून हें काम सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूचे एक सभासद, मि. ए. एच लॉइड, ह्यांजकडे सोपविण्यांत येणार आहे असें समजतें.

---

## ग्रेट ब्रिटनचें राष्ट्रीय कर्ज

ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रीय कर्जांत गेल्या वर्षी सुमारें ३०० कोटि रुपयांची भर पडली. त्या देशाचें एकूण देणें सुमारें १०६ अब्ज रुपये आहे.


**६ टक्के मासिक आंवक ठेव**

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

**स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

**कॉमनवेल्थ विमा कंपनी**

**लिमिटेड, पुणें.**

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

**दि प्रॉव्हिन्शिअल बँक**

**ऑफ अिण्डिया लिमिटेड**

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय: २२/अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: अेस. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्**: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्**: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी**: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटींवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यांवर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें २

## सोनें, चांदी, नोटा आणि नाणीं

### हिंदुस्थानांतील सोन्याचें उत्पादन

१९३७ मध्यें हिंदुस्थानांत आणि ब्रम्हदेशांत मिळून ३,६३,२८१ औंस सोन्याचें उत्पादन झालें.

### हिंदुस्थानांतील चांदीचें उत्पादन

हिंदुस्थानांतील चांदीच्या उत्पादनापैकीं बहुतेक सर्व उत्पादन म्हैसूर संस्थानांतील कोलारच्या खाणींतून होतें. १९३७ सालीं २८,९५९ औंस चांदी खाणींतून निघाली. १९३६ सालांतील उत्पादनाचा आकडा ह्यापेक्षां ४½ हजार औंसांनीं कमी होता.

### एक रुपयाच्या आणि अडीच रुपयांच्या चलनी नोटा

एक रुपया आणि अडीच रुपये किंमतीच्या नोटा महायुद्धाचे वेळीं हिंदुस्थानांत काढण्यांत आल्या. १९२६ नंतर ह्या नोटा छापण्यांत आल्या नाहींत. तथापि, अद्याप ३२ लक्ष रुपये किंमतीच्या एक रुपयावाल्या नोटा आणि १ लक्ष रुपये किंमतीच्या अडीच रुपयेवाल्या नोटा प्रचारांत आहेत.

### बनावट नोटा

१९३७ सालीं एकूण १, ९४४ बनावट चलनी नोटा रिझर्व्ह बँकेच्या निदर्शनास आल्या, त्यांपैकीं १,७१० नोटा दहा रुपयेवाल्या होत्या आणि शंभर रुपयेवाल्या नोटांची संख्या १५५ होती.

### रुपयाचें नाणें

१९२२ सालानंतर हिंदुस्थानांत नवीन रुपये पाडण्यांत आलेले नाहींत. १९३७ सालीं खेळत असलेल्या रुपयांपैकीं शेकडा ४८½ इतकीं नाणीं पांचव्या जॉर्जच्या मुखवट्याचीं होतीं, शेकडा ३०½ सातव्या एडवर्डच्या मुखवट्याचीं होतीं आणि शेकडा १८ रुपयांवर व्हिक्टोरिया राणीचा मुखवटा होता.

### ढब्बू पैसे

ढब्बू पैसा सरकारी तिजोरींत गेला म्हणजे तो परत व्यवहारांत खेळवला जात नाहीं. अशा रीतीनें गेल्या वर्षी १४½ हजार रुपये किंमतीचे ढब्बू पैसे व्यवहारांतून काढून घेण्यांत आले.

### बनावट नाणीं

१९३७ सालीं एकूण २ लक्ष, ७ हजार रुपये किंमतीचीं बनावट नाणीं सरकारी तिजोऱ्यांत आणि रेल्वे स्टेशनांवर कापून रद्द करण्यांत आलीं. त्यांपैकीं १ लक्ष ८३ हजार रुपये होते.

## इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटचा अहवाल

इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटचा, १९३७–३८ सालांतील कामासंबंधीं अहवाल प्रसिद्ध झाला आहे. १९३६–३७ मध्यें ह्या खात्यानें निरनिराळ्या सरकारी खात्यांसाठी ६½ कोटि रुपयांचा माल मागविला होता; १९३७–३८ मध्यें हा आकडा ७ कोटि ९० लक्ष रुपये झाला. लष्करी आणि इतर संरक्षक खात्यांतर्फे १ कोटि, ८९ लक्ष रुपयांची खरेदी करण्यांत आली. गेल्या वर्षीच्या मानानें ह्या खरेदींत शेकडा ५८ इतकी वाढ झाल्याचें आढळून येतें. कापडाची खरेदीहि अहवालाचे वर्षी ४४ लक्ष रुपयांची अधिक झाली. रेलवेजसाठी मागविलेल्या मालाची किंमत ४ कोटि, ८ लक्ष रुपये भरली. शक्यतोंवर हिंदी मालाचा पुरवठा करण्याचें स्टोअर्स डिपार्टमेंटचें धोरण होतें आणि हिंदी मालांत सुधारणा व्हावी ह्याप्रीत्यर्थ योग्य तो सल्ला आणि आवश्यक त्या सूचना देण्याचें काम ह्या खात्यानें दक्षतेनें बजावलें असा अहवालांत उल्लेख आहे. एकूण खरेदीपैकीं ४ कोटि रुपयांचा माल हिंदी बनावटीचा होता.

**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

**" URBAN BANKS "**

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L K. Bhagwat. Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या
एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षे मुदतीच्या
**ठेवी घेणें आहेत**
व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.
आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें
द. म. द. शें. ४चार आणे व्याजानें
व
अनुक्रमानें रु. १०० ते २०००
देण्याची नवीन योजना. लवकर अर्ज करा, लवकर कर्ज मिळवा. त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिस:-गिरगांव, मुंबई. ब्रँच:-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

## ताळेबंद तयार कसा करावा ?
### ( २ )
### नवीन कंपनी कायद्यानें केलेल्या सुधारणा

### ( १० ) उपस्थित होण्याजोगीं देणीं

( अ ) कंपनीकडे मागण्यांत आलेल्या परंतु कर्ज म्हणून कंपनीस बंधनकारक न झालेल्या रकमा, ( ब ) कांहीं विशेष गोष्ट घडल्यास ज्या रकमा देणें कंपनीस बंधनकारक होईल, अशा रकमा ( क ) क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांवरील थकलेलें डिव्हिडंड, असे तीन विभाग ह्या सदरांत येतात. कंपनीचे डायरेक्टर किंवा इतर अधिकारी ह्यांचेतर्फे कंपनीनें गॅरंटी घेतली असेल, तर अशा हमीची रकम वेगळी दाखवावी लागते. कंपनीनें डिस्कौंट केलेल्या हुंड्या, कंपनीजवळ भागांवरील मागणी न केलेले कॉल्स, आग, आगबोट व ॲक्सिडेंट विमा पॉलिसीवरील क्लेम ( कंपनीनें मान्य केलेले ), कंपनीचे डायरेक्टर व अधिकारी ह्यांचेतर्फे घेतलेली हमी, इतरांतर्फे घेतलेली हमी, इत्यादि बाबींचा समावेश "उपस्थित होण्याजोगीं कर्जे" ह्या सदरांत होतो. हमीची सबंद रकम— कंपनीनें रकम मुळीच दिलेली नसली तरी— ताळेबंदांत दाखविली पाहिजे.

| भांडवल आणि देणें | रु. आ. पै | रु. आ. पै |
|---|---|---|
| भांडवलः— | | |
| अधिकृत भांडवल......भाग प्रत्येकी......रु. | | |
| (वेगवेगळ्या दर्जांचे भाग निर्दिष्ट करावेत)... | | |
| विक्रीस काढलेलें भांडवल......भाग प्रत्येकी......रु. ...... | ... | |
| (१) रोख रक्कम न घेता दिलेलें... ...भाग प्रत्येकी......रु. | | |
| (२) रोख रकमेबद्दल दिलेले...... ...भाग प्रत्येकी......रु. | | |
| खपलेलें भांडवल......भाग प्रत्येकी ......रु. ...... | | |
| वसूल झालेलें भांडवल......भाग प्रत्येकी ......रु. ...... | ... | |
| वजा—येणें झाले | | |
| (१) मॅनेजिंग एजंटांकडून......... | ... | |
| (२) इतरांकडून.................. | ... | |
| अधिक—रद्द केलेले भाग............... | ... | ... |
| रिझर्व्हज ................................ | | ... |
| डिबेंचर्स ( त्याचें तारण निर्दिष्ट करून )...... | | ... |
| सिंकिंग फंड.............................. | | ... |
| इतर फंड ( निवळ नफ्यांतून काढलेले )...... | | ... |
| पेन्शन अगर इन्शुअरन्स फंड......... | | ... |
| संशयित व बुडीत कर्जाची तरतूद ...... | | ... |
| कर्जे | | |
| (अ) तारणावरील | | |
| (१) गहाणावरील......... | ... | |
| (२) डिबेंचर्सवरील......... | ... | |
| (३) बँकांकडील......... | ... | |
| (४) दुय्यम कंपन्यांची देणी...... | ... | |
| (५) तारणावरील इतर कर्जे ...... | ... | |
| (६) तारणावरील कर्जांवर दावपाचें व्याज...... | ... | |

| भांडवल आणि देणें | रु. आ. पै | रु. आ. पै |
|---|---|---|
| (ब) विगर तारणावरील | | |
| (१) बँकांकडून...... | ... | |
| (२) कायम ठेवी...... | ... | |
| (३) अल्प मुदतीची ..... | ... | |
| (४) डायरेक्टर्स, मॅनेजर्स अगर मॅ. एजंट्स ह्यांकडून घेतलेली... | ... | |
| (५) दावपाचें व्याज ............ | ... | |
| (६) दुय्यम कंपन्यांकडून घेतलेली... | ... | ... |
| न नेलेलें डिव्हिडंड ........................ | | ... |
| देणीं | | |
| माल पुरविल्याबद्दलचीं...... | ... | |
| खर्चासंबंधीं .............. | ... | |
| स्वीकारलेल्या हुंड्यांविषयीं...... | .. | |
| इतर | ... | ... |
| आगाऊ स्वीकारलेल्या रकमा ........ | | ... |
| नफा तोटा... ........... ............ | | ... |
| | | ... |
| उपस्थित होण्याजोगीं देणीं ............ | ... | |
| कंपनीकडे मागण्यांत आलेल्या रकमा... | ... | |
| कांहीं अटींच्या पूर्ततेवर कंपनीस बंधनकारक होणाऱ्या रकमा...... | ... | |
| क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांवरील थकलेलें डिव्हिडंड...... | ... | ... |

### गांधी सेवा संघाची जमीनमहसूल चौकशी समिति

गांधी सेवा संघानें एक उपसमिती नेमून तिच्याकडे, सध्याच्या हिंदुस्थानच्या परिस्थितींत शेतकऱ्यांनीं आपला सारा व खेडेगांवांतील इतर कर पैशाचे स्वरूपांत अगर धान्याचे स्वरूपांत देणें त्यांचे दृष्टीनें ज्यास्त फायदेशीर आहे, ह्यासंबंधीं चौकशी करण्याचें काम सोपविलें आहे. धान्याचे स्वरूपांत कर देणें शेतकऱ्यांस फायदेशीर असल्याचें समितीस आढळून आल्यास तिनें ह्या योजनेविषयीं तपशीलवार व्यावहारिक सूचना करावयाच्या आहेत. समितीमध्यें श्री. गंगाधरराव देशपांडे, श्री. कुमारप्पा, श्री. किशोरलाल मश्रूवाला आणि बाबू राजेंद्र प्रसाद, हे आहेत. समितीनें प्रश्नपत्रिका काढली आहे. प्रश्नांचीं उत्तरें ३१ ऑक्टोबरचे आंत तिला मिळावींत, अशी तिची विनंति आहे.

### बेकारीविषयीं आकडे गोळा करा

१९४१ सालीं हिंदुस्थानाची शिरगणती होणार आहे, त्यावेळीं बेकारीसंबंधीं आकडे गोळा करण्यांत यावे, अशी सूचना मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरनें हिंदुस्थान सरकारास केली आहे. बेकारीच्या व्यापकतेविषयीं आज विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं. येत्या शिरगणतीचे प्रसंगीं ही उणीव भरून काढण्याची संधी येत आहे, असें चेंबरनें सरकारास लिहून कळविलें आहे.

### कालव्यांसंबंधीं संशोधन केंद्र

खडकवासला येथील इरिगेशन आणि हायड्रो डायनॅमिक रिसर्च स्टेशन मार्च, १९३९ पर्यंत चालू रहाण्यास हिंदुस्थान सरकारनें मंजुरी दिली आहे. केंद्राची कायमची जागा तोपर्यंत निश्चित केली जाईल.

### इरिगेशन कमिटीचा अहवाल

मुंबई सरकारच्या पाटबंधारे व कॅनॉल्स बाबतच्या धोरणासंबंधीं तपशीलवार चौकशी करून सूचना करण्यासाठी सरकारनें सर मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली गेल्या डिसेंबरमध्यें एक कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला आहे. तिच्या शिफारसी खालीलप्रमाणें आहेत:—

(१) विशिष्ट योजनेस अनुसरून पाणी पुरविण्याविषयीं आणि पाण्याचे निश्चित दर ठरवून त्याप्रमाणें पट्टी आकारण्यासंबंधींच्या धोरणांत बदल होणें आवश्यक आहे.

(२) ही व्यापक सुधारणा अंमलांत येण्यापूर्वी, पाण्याच्या चालू दरांत फरक होणें जरूर आहे. शेतीस द्यावयाच्या पाण्याचे सध्याचें मोसमी दर चालू ठेवावेत, मात्र उंसाच्या बाबतींत हे दर पिकांवर अवलंबून रहावेत.

(३) बिगर शेतीच्या कामाकडे उपयोगांत येणाऱ्या पाण्याचे पट्टींत कमिटीनें दुरुस्ती सुचविली आहे. पुणें शहर म्युनिसिपॅलिटीस लागणाऱ्या पाण्यावर रोजच्या पहिल्या ९० लक्ष गॅलनपर्यंत प्रत्येक १० हजार गॅलनांस २ रु. ८ आ. ह्या दरानें पट्टी आकारावी आणि त्याच्यापेक्षा अधिक वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर ४ रुपये दरानें पट्टी घ्यावी.

(४) साखरेच्या कंपन्यांशीं सरकारनें करार केले आहेत, त्यांत दुरुस्ती करून, ज्या मुदतीपर्यंत त्यांस सरकारनें पाणी पुरवण्याचें कबूल केलें आहे, त्या मुदतीपर्यंतचा पाण्याचा दर निश्चित करण्यांत यावा. दर एकरास वार्षिक ४५ रुपये अगर ओव्हर लॅप धरून ६० रुपये हा दर कमिटीनें सुचविला आहे.

(५) प्रांतांतील सहा प्रमुख कालव्यांचे बाबतींत तात्काळ सुधारणा घडवून आणण्यांत यावी. लहान कालव्यांकडे नंतर लक्ष पुरविणें सोपें जाईल.

(६) कालव्यांच्या टप्यांटप्यांत कोणत्या प्रकारचें पीक काढण्यांत आलें पाहिजे, ह्याविषयीं पुन: विचार करून क्षेत्र वाटून दिलें पाहिजे.

(७) पाण्याखालील जमिनींत पिकविलेल्या मालाच्या बाजारभावास अनुसरून पट्टी बसविण्यांत यावी आणि ही पट्टी निदान सहा वर्षें अंमलांत असावी.

(८) नवीन हातीं घ्यावयाच्या कामांची योजना आखण्यांत येऊन त्याविषयीं निश्चित कार्यक्रम ठरविण्यांत यावा.

(९) ह्या नवीन उपक्रमांत सरकारास सहाय आणि इरिगेशन खात्याच्या कामांत तत्परता आणण्यास मदत हीं मिळावीं ह्याकरितां कालवे कमिटीची नेमणूक करण्यांत यावी. त्याचप्रमाणें, कमिटीच्या सूचना अंमलांत आणण्याकरितां एक प्रांतिक इरिगेशन बोर्ड नेमण्यांत यावें.

(१०) इरिगेशन खात्याचे अंमलदार आणि शेतकरीवर्ग ह्यांचे संबंध ज्यास्त निकटवर्ती असावेत; शेतकरीवर्गानें स्वावलंबी बनण्यास शिकावें आणि इरिगेशन खात्याच्या अंमलदारांनीं आपलें काम चोख करावें, इत्यादि सूचना कमिटीनें केल्या आहेत.

### दि एडवर्ड ससून मिल स्पिनिंग सेक्शन व वीव्हिंग सेक्शन को. के. सोसायटीज्.

(लि. आ. म.)

वरील सोसायट्यांची संयुक्त वार्षिक साधारण सभा गुरुवार ता. १ सप्टेंबर, १९३८ रोजीं मिलचे आवारांत मि. एम्. डी. रुबीन्स (डेप्युटी सुपरिंटेंडेंट इ. डी. ससून आणि कंपनी) यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. सभेस सुमारें ८०० सभासद हजर होते.

दोन्ही पेढ्यांच्या अहवालांवरून असें दिसून येतें कीं सोसायट्यांच्या कामकाजांत सर्वांगीण प्रगति झालेली आहे. त्यांत प्रामुख्यानें 'भाग भांडवल,' 'ठेवी' व 'सभासद' या बाबींचा उल्लेख केला पाहिजे. या सोसायट्यांमध्यें ठेवींची जी स्पृहणीय स्थिति दिसून येते तशी इतर औद्योगिक क्षेत्रांतील सोसायट्यांत क्वचितच दिसून येईल.

सोसायट्यांनीं केलेल्या नफा वाटणीकडे पाहिलें तर सोसायट्या भरभराटींत आहेत असें दिसुन येतें.ठेवींवर शेकडा ३½ टक्के व्याज व भांडवलावर शेकडा ६¼ टक्के डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें असून त्याशिवाय स्पिनिंग सेक्शनच्या सोसायटीनें सभासदांनीं भरलेल्या व्याजांत सूट म्हणून शेकडा १२½ टक्के रिबेट रूपानें परत केलें आहे. या वर्षी दिलेल्या निरनिराळ्या देणग्या देखील दूर विचार करून दिलेल्या आहेत व त्यावरून कमिटीच्या सभासदांना सार्वजनिक हितविषयक कळकळीची जाणीव आहे हें सिद्ध होतें. मिलमधील कामगार-बालसंगोपनालय व कामगार क्रीडा संघ, ससून कामगार मोफत वाचनालय, अँग्लो हिंदी स्कूल व श्रद्धानंद महिलाश्रम यांना दिलेल्या देणग्या योग्य कारणीं नाहींत असें कोण म्हणेल? विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे क्षय निवारण हॉस्पिटल फंडाला स्वयंस्फूर्तीनें देण्यांत आलेली देणगी ही होय. याबद्दल व्यवस्थापक मंडळ अभिनंदनास पात्र असून हें उदाहरण इतरांनीं कित्ता गिरवण्यासारखें आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणांत रुबीन्स साहेब यांनीं सोसायट्यांच्या प्रगतीबद्दल आनंद व्यक्त करून ही प्रगति अशीच कायम टिकविली जाईल अशी आशा व्यक्त केली. सभासदांनीं काटकसर अंमलांत आणून ठेव वाढविण्याकडे यापेक्षाहि अधिक लक्ष द्यावें अशी त्यांनीं विनंति केली. कामगारांचा विमा उतरण्याविषयींचा प्रश्न मॅनेजिंग कमिटीनें हातीं घ्यावा असें सांगून त्यांनीं अशी आशा व्यक्त केली कीं, ही गिरण लौकरच मद्यरहित कोरडी व्हावी. दोन्ही कमिट्यांना धन्यवाद देऊन सोसायट्यांची उत्तरोत्तर भरभराट होवो अशी आशा व्यक्त करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

अध्यक्षीय भाषण मराठीमध्यें श्री. रेगे यांनीं सविस्तरपणें समजाऊन सांगितलें. रा. कुळकर्णी व रा. ब. बोले यांचीहि समयोचीत भाषणें झालीं.

यानंतर कामगारांतर्फे मर्दानी खेळांचे प्रयोग व कुस्त्यांचे प्रेक्षणीय सामने वगैरे होऊन विजयी वीरांना रेशमी फेटे बक्षिस म्हणून देण्यांत आले नंतर सभा बरखास्त झाली.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## शेअर बाजारांतील चलती-मंदी

### सट्टेबाजी थांबवा

मुंबई येथील नेटिव्ह शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली होती, त्यावेळीं तिचे अध्यक्ष, श्री. के. आर. पी. श्रॉफ, ह्यांनीं आपल्या भाषणांत गेल्या वर्षांतील परिस्थितीचा आढावा घेऊन, असोसिएशनच्या सभासदांस आपले व्यवहार आवाक्याबाहेर जाऊं न देण्याविषयीं इषारा दिला. सध्या बाजारांतील परिस्थिति समाधानकारक असली, तरी गेल्या वर्षीच्या अनुभवानें शहाणे होऊन दलालांनीं आपले व्यवहार सुरक्षिततेच्या मर्यादेंत राखावे, अशी त्यांनीं सभासदांस सूचना केली. नंतर ते म्हणाले:—

"सन १९३७ च्या प्रारंभीं औद्योगिक चलतीचीं चिन्हें दिसूं लागलीं, त्याचा परिणाम प्रथम टाटा ऑर्डिनरी आणि टाटा डिफर्ड भागांवर झाला व त्यांची किंमत अनुक्रमें ४४५ रुपयांपर्यंत आणि २,२९० रुपयांपर्यंत चढली. बाजारभाव चढीचे रहातील ह्या अपेक्षेनें दलाल व्यवहार करूं लागले, तथापि पुढें भाव पडले. ही प्रवृत्ति न्यूयॉर्क, लंडन, कलकत्ता येथील सर्वच बाजारांत आढळून आली. कापडाच्या गिरण्यांचे भाग कांहीं काळ तेजींत राहिले, परंतु टेक्स्टाइल लेबर इन्कायरी कमिटीच्या सूचनांमुळें कपास कापडाच्या गिरण्यांचा नफा वाटण्याची शक्ती कमी होणार ह्या अपेक्षेनें भागांची किंमत उतरली. तथापि, ह्या धंद्याची परिस्थिति अत्यंत समाधानकारक असल्याचें दिसून येतें. सिमेंटचें उत्पादन वाढत असलें तरी डालमियांच्या कारखान्यांतून निघणारा माल वाढती मागणी पचवूं शकेल. अर्थात्, सिमेंट कारखान्यांच्या भागांची किंमत चांगली राहील, असें निःशंकपणें विधान करतां येणें कठीण आहे. वीज कंपन्यांची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत आहे. सरकार त्यांचे नफ्यावर नियंत्रण घालणार असल्याचें जाहीर झाल्यापासून वीज कंपन्यांच्या भागांचे बाबतींत बराच चढ-उतार आढळून येत असून अद्यापहि त्यांचे बाजारभाव स्थिरावलेले नाहींत."

असोसिएशननें नवीनच अंमलांत आणलेल्या नियमांचा उल्लेख करून, श्री. श्रॉफ म्हणाले, "हे नियम अंमलांत आले, ह्याचा अर्थ रोखे बाजारांतील सट्टेबाजी बंद झाली, असा कोणीहि करूं नये. कितीहि कडक नियम केले, तरी मनुष्यस्वभाव पालटणें अशक्य आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे."

---

राष्ट्रसंघाच्या मे, १९३८ मधील बैठकीचे वेळीं ब्रिटिश सरकारनें ॲबिसिनियाच्या प्रश्नाबाबत जें धोरण स्वीकारलें, त्या संबंधीं हिंदुस्थान सरकारचा सल्ला ब्रिटिश सरकारनें अगोदर घेतला होता. ब्रिटिश प्रतिनिधि जें धोरण आखतील त्यानुसार हिंदी प्रतिनिधि मत देतील, असें हिंदुस्थान सरकारनें कळविलें होतें.

---

## दि पूना प्रायव्हेट मोटार ड्रायव्हर्स असोसिएशन, पुणें

वरील संस्थेची सर्वसाधारण सभा गेल्या बुधवारीं संस्थेच्या ऑफिसमध्यें भरली होती. संस्थेचें तिसऱ्या वर्षाकरितां कार्यकारी मंडळ निवडलें गेलें. श्री. के. व्ही. केळकर एम. ए., एलएल. बी., वकील हे संस्थेचे अध्यक्ष असून श्री. गो. पां. बर्वे व श्री. द. रा. कुळकर्णी हे अनुक्रमें चेअरमन व सेक्रेटरी आहेत. संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होत आहे.

### पुणें सेंट्रल को. बँक स्टाफ को. क्रे. सोसायटी लि०

वरील सोसायटीच्या सभासदांची संख्या ४४ असून त्यांनीं एकूण १९० भाग घेतलेले आहेत. सोसायटीकडे १३,७२५ रुपयांच्या कायम ठेवी आहेत. तिच्या एकूण १७ हजार रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी ७½ हजार रुपये सभासदांकडून येणें असून ८,०५० रुपयांचे पुणें सें. को. बँकेचे भाग सोसायटीनें घेतलेले आहेत. ३० जून रोजीं संपलेल्या वर्षी सोसायटीस २९० रु. १२ आ. ११ पै नफा झाला. तिची नववी वार्षिक साधारण सभा ता. ५ सप्टेंबर रोजीं भरली होती. त्यावेळीं १९३७-३८ चा अहवाल, ताळेबंद आणि नफ्याची वांटणी (६ टक्के दरानें डिव्हिडंड) मंजूर करण्यांत आली. श्री. बा. चिं. भानू (चेअरमन), श्री. ना. वि. पांडव, श्री. दा. अ. पुराणिक, श्री. द. स. कुलकर्णी आणि श्री. द. दि. चितळे ह्यांचें कार्यकारी मंडळ नेमण्यांत येऊन लोकल ऑडिटरचे जागीं श्री. स. ल. कवडी ह्यांची निवड झाली. श्री. मो. पा. देशपांडे आणि श्री. प्र. न. प्रभुणे ह्यांस सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

---

### पुणें जिल्हा कोऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेच्या ता. १८ सप्टेंबर रोजीं होणाऱ्या डायरेक्टर बोर्डाच्या निवडणुकीस खालील उमेदवार उभे आहेत असें रा. रा. ब. वसगडेकर, मॅनेजर हे कळवितात.

**बिन कर्जदार सभासद (जागा २)**

१ श्री. गजानन महेश्वर गुप्ते, वकील, २ श्री. दत्तात्रय दिवाकर चितळे, ३ श्री. भोगीलाल वालचंद गुजर आणि ४ श्री. गणपत शंकर दरेकर.

**कर्जदार मतदार**

पश्चिम भाग (जागा १)

१ श्री. साहेबलाल मोहनलाल परदेशी

पूर्व भाग (जागा १)

१ श्री. भिकाजी बलवंत इंगळे; २ श्री. भिकू नारायण जगताप; ३ श्री. सखाराम माधवराव जाधव आणि ४ श्री. गंगाजीराव जानराव शितोळे.

---

## दि बाँबे प्राव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

जाहीर खबर देण्यांत येतें कीं, या बँकेची सत्ताविसावी ऑर्डिनरी जनरल मीटिंग बँकेच्या रजिस्टर्ड कचेरींत, अपोलो स्ट्रीट, कोट, मुंबई येथें मंगळवार ता. २० माहे सप्टेंबर १९३८ इसवी रोजीं दुपारीं १-४५ (स्टँ. टा.) वाजतां भरविण्यांत येईल. सदर सभेंत पुढील कामें होतील.

१. ता. ३० जून, १९३८ रोजीं पुऱ्या झालेल्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा रिपोर्ट व तपासनिसांनीं तपासलेले हिशेब मंजूर करणें.

२. डिव्हिडंड जाहीर करणें

३. डायरेक्टर निवडणें.

४. हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचा मेहेनताना ठरविणें.

५. बँकेच्या पोटनियमांच्या दुरुस्त्यांचा विचार करणें व योग्य वाटल्यास त्या मंजूर करणें.

बोर्डाच्या हुकुमावरून
वैकुंठ एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर

मुंबई, ता. १८ ऑगस्ट, १९३८.

बँकेचीं ट्रॅन्सफर बुकें ता. २१ सप्टेंबर, १९३८ ते ३ ऑक्टोबर, १९३८ दोन्ही दिवस धरून बंद रहातील.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११७–११ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०३—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८–१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८-१०¾ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—७ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४२—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०–६ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११६–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९३८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७४२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११६—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | ११०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १७२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३८७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४५०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | ११०—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४२—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३९–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४५१०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६१–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २१८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पे ... | १४४०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १०७—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३६–८–० |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०-१२-० |


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०५,५०,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ).

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.



## ‘यश आलेंच पाहिजे. मग महाराष्ट्रीय कसले ?’

अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला सुरुवात झाली, ५०० एकर उंसाची लागवड करतां आली.

### तारीख १० जानेवारी १९३९च्या मकर–संक्रमणाला

## बृहन्महाराष्ट्रीय साखर

व

### १२५० एकर उंसाची नवी लागवड

यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास बोर्डानें मंजूरी दिली आहे.

रा.ब. काकासाहेब सहस्रबुद्धे, डॉक्टर रा. ह. भडकमकर, M.A., M.D. रा. ब. बि. क. झळ्ये इंदोर, रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.**
२५७ बुधवार पेठ, पुणें २, बेलबागेसमोर.

अप-टु-डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें | १२ तासांत कपडे शिवून मिळतील. | [ खादी भांडाराचे माडीवर

## फराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनकिरतां महाराष्ट्र, **कर्नाटक** आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

## दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

**( हेड ऑफिस : जळगांव )**

माहिती मागवा | **चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस,** लक्ष्मी रोड, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशिकच्या **सह्याद्रि** विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

## सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा

**मोती चौक : : : सातारा**

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## K. K. & Co.

**Photographic Dealers**
**POONA.**

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.